महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan"3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001
Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**पत्र-ईमेल** क्रमांक:-कक्ष-२३(२)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.१४/ ९८ /२०२३-२४, दिनांक:- ०६/०४/२०२३

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
पूर्व, नागपूर.

विषय:- नागपूर व चंद्रपूर जिल्ह्यातील उमरेड ते नागभिड वीज वाहिनी व्याघ्र भ्रमणमार्ग मधून जात असल्याने वन्यजीव मान्यता घेण्याकरीता प्रस्ताव.

संदर्भ :- या कार्यालयास उद्देशून लिहिलेले आपले कार्यालयीन पत्र क्र. कक्ष-१ (ब)/सव्हे/ २२-२३/९२१, दिनांक २१/०३/२०२३.

संदर्भिय पत्रान्वये विषयांकित प्रकरणीचा प्रस्ताव ३ प्रतीत या कार्यालयास दिनांक २१/०३/२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावाचे तांत्रिक संस्करण केले असता खालीलप्रमाणे त्रृटी निदर्शनास येत आहेत.

१. संदर्भिय पत्रासोबत प्राप्त झालेले ३ प्रस्ताव हे फाईल कव्हरमध्ये निटनेटके सादर करणे अभिप्रेत आहे, परंतु संपूर्ण प्रस्तावाला स्टॅपल पीन लावून सादर केले गेले असून, ते फाईलमध्ये सुरक्षित नसल्यामुळे नकाशे आणि प्रस्तावातील काही अभिलेख खराब झालेला आहे. सदर प्रस्ताव राज्य शासनास या स्तरावरून सादर करण्यात येत असल्यामुळे, भविष्यात सादर करण्यात येणारे प्रस्ताव फाईलमध्ये च सादर करावे.
२. प्रस्तावातील Part-I मध्ये केंद्र शासनाने १९/१२/२०१२ रोजीचे पत्रान्वये विहित केलेल्या प्रपत्रामध्ये कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केली असून, कार्यालयाचा सील उमटविलेला नाही. तसेच सदर प्रपत्रावर The Officer Incharge of the NP/WLS यांनी स्वाक्षरी केलेली नाही. सदर प्रस्तावात जरी राष्ट्रीय उद्यान/ अभयारण्याचे क्षेत्र समाविष्ट नसले, तरी नागपूर आणि ब्रम्हपूरी वनविभागाचे अधिनस्त व्याघ्र भ्रमणमार्गाचे क्षेत्र समाविष्ट आहे. त्यामुळे उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर आणि ब्रम्हपूरी यांनी स्वाक्षरी करून त्यांचे कार्यालयाचा गोल शिक्का (office seal) उमटविणे अत्यावशक आहे. पुर्तता करावी.

३. प्रस्तावातील Part-I मधील अनु क्र. ७ वर Opinion of the Division Forest officer (Incharge of the Corridor Area) is separately attached within proposal असे नमूद आहे. पंरतु सदर अभिलेख प्रस्तावासोबत सहपत्रीत करण्यात आलेला नाही. पुर्तता करावी.

४. प्रस्तावातील उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे Part-III मधील अनु क्र. १० वर मुनिया संवर्धन राखीव क्षेत्राची अधिसुचना (Notification not issued) असे नमूद केले आहे. परंतु दिनांक ११/०५/२०२१ रोजीचे अधिसुचनेद्वारे ९६.०१ चौ.कि.मी. क्षेत्राची मुनिया संवर्धन राखीव क्षेत्राची अधिसुचना निर्गमित झालेली आहे. सुधारणा करावी.

५. प्रस्तावातील उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचे Part-III मधील अनु क्र. १९ वर Installation of Bird Reflectors at proper place असे नमूद आहे. प्रकल्प यंत्रणेने उपशमन – उपाययोजनांचा आराखडा (Mitigation Plan) तयार करून प्रस्तावासोबत सहपत्रीत करणे आवश्यक आहे. पुर्तता करावी.

६. प्रस्तावातील Specified preform: Drone Survey Report मध्ये अनु क्र. १० वर एकूण ४७६ वृक्षतोड प्रस्तावित असल्याचे नमूद आहे, त्यापैकी १० वृक्ष उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर आणि ३७६ वृक्ष उपवनसंरक्षक (प्रादेशिक), ब्रम्हपूरी वनविभाग यांचे कार्यक्षेत्रातील असल्याचे नमूद आहेत. बेरीज केली असता १०+३७६= ३८६ वृक्षतोड दिसून येते. यामध्ये ९० वृक्षतोड तफावत आहे. नेमके किती वृक्षतोड प्रस्तावित आहे, हि बाब तपासून अचूक आकडेवारी नमूद करावी.

७. सदर अभिलेखावर फक्त कार्यकारी अभियंता यांनी स्वाक्षरी केली असून, उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर आणि ब्रम्हपूरी यांनी स्वाक्षरी केलेली नाही. पुर्तता करावी.

८. प्रकल्प यंत्रणेने २% रक्कम भरणा करण्यास तयार असण्याचे हमीपत्र सादर केले असून, त्यामध्ये संपूर्ण प्रकल्प किंमतीच्या म्हणजेच रू. १८,६६,३४,८९२ /- चे २% रक्कम ३७,३२,६९८/- भरणा करण्याचे हमीपत्र आहे. त्याअनुषंगाने कळविण्यात येत की, Information Sheet -A नुसार प्रस्तुत प्रस्तावामध्ये व्याघ्र भ्रमणमार्गातील अंदाजपत्रकीय रक्कम रू. ६१,९६,२७८/- ऐवढी असून, फक्त सदर रक्कमेच्या २% रक्कम रू. १,२३,९२५ /- ही रक्कम प्रकल्प यंत्रणेस भरणा करावयाची आहे. त्यामुळे हमीपत्रात आवश्यक सुधारणा करून पुर्तता करावी.

९. प्रस्तावासोबत Route Map २ नकाशे सहपत्रीत आहेत. सदर नकाशामध्ये नमूद संदर्भ सूचित Total Length Statement मध्ये दर्शविल्याप्रमाणे Route आणि Length स्पष्ट होत नाही, त्यामुळे सदर बाबी स्पष्ट दिसतील अश्या प्रकारे ठळक पणे दर्शवावे. सदर Route दर्शवितांना व्याघ्र भ्रमणमार्गात येणारी लांबी विशिष्ट रंगाने दर्शवावी.

१०. प्रस्तावातील Google Map ला संदर्भसूची दर्शविली नाही. पुर्तता करावी.

११. प्रस्तावासोबत Drone Video आणि Drone Photograph प्रकल्प यंत्रणेने सहपत्रीत केलेले नाही. पुर्तता करावी.

१२. प्रस्तावासोबत Part-I, II, III व IV ची Soft copy Pendrive मध्ये सादर करावी.

वरीलप्रमाणे निदर्शनास आलेल्या त्रृटींची पुर्तता करून प्रस्ताव प्रस्ताव फेरसादर करावा. आपणांस असेही कळविण्यात येते की, क्षेत्रीय स्तरावरून प्राप्त होणा-या प्रस्तावांचे आपले स्तरावर चिकित्सक तांत्रिक संस्करण न करता या कार्यालयास सादर केली जातात ही बाब प्रशासकीय दृष्ट्या योग्य नाही. आपलेमार्फत प्राप्त होणारे प्रस्ताव अचूक व परिपूर्ण नसल्यामूळे पत्र व्यवहारामध्ये या कार्यालयाचा अनाठाई वेळ खर्ची होवून प्रकरण निकाली काढण्यास विलंब होतो, सदर विलंब टाळण्याच्या दृष्टीने या कार्यालयास सादर होणारे प्रस्ताव अचूक आहेत, याबाबत खात्री करूनच सादर करावे. **यासोबत प्रस्तावाच्या २ मूळ प्रती परत पाठविण्यात येत आहेत.**

**सहपत्रः- वरीलप्रमाणे**

(महिप गुप्ता)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी :- मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

प्रतिलिपी :- उपवनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर/ब्रम्हपूरी यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

प्रतिलिपी :- कार्यकारी अभियंताएचव्ही प्रोजेक्ट डिव्हीजन-१, २ माळा, विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.
(Email- eeehvconstdn1@gmail.com )